# ~~संपादकीय (Editorial)~~

# 'अंतराळ' कीय

गेले २-३ दिवस मी फेब्रुवारीच्या अंकासाठी 'संपादकीय' लिहण्याचा प्रयत्न करीत होतो पण 'भट्टी' काही जमत नव्हती. संपादकीय लिहण्याचा आतापर्यंत कधीच योग आला नव्हता.त्यामुळे पूर्वानुभव शून्य.अशा लेखामध्ये काय काय लिहायाचे असते ह्याची कल्पना यावी म्हणून मुंबईहून आणलेले काही जूने दिवाळी अंक चाळले. त्यातल्या लेखांमध्ये कुठला 'मसाला' साधारणपणे भरलेला असतो हे बघितलं. बहुतेक लेख भारदस्त मराठी भाषेत लिहलेले दिसले. त्यामध्ये सामाजिक, राजकीय, कौटुंबिक समस्यांचे उल्लेख होते.. त्यावर प्रक्ष्न होते .. त्यावर उपदेश होते.. आवाहने होती. मी कमीत कमी १५-२० तरी अंक पालथे घातले आणि त्यावरून मला एकच ठामपणे कळले की

'संपादकीय लिहणे' हे आपुले काम नोहे

आणि म्हणूनच 'संपादकीय' ह्या सदरास 'अंतराळकीय' असे नवीन नाव दिले आहे. ह्या सदरात.. प्रेसीडंट बूशला 'ईराक वॉर त्याने कसे हाताळायला पाहिजे' ह्याचा राजकीय सल्ला नसणार किंवा ...अमेरिकेतल्या 'देशी' तरुण पिढीनं 'देशी' समाजाचे नाव मानाने पुढे आणण्यासाठी 'काय करायला पाहिजे' आणि 'काय नको करायला पाहिजे' ह्यावर त्यांना मौल्यवान उपदेश नसणार. येथे माझ्या ह्या कॉलममध्ये फक्त..'प्रेमळ सूचना' असतील..'नम्र विनंत्या' असतील..'मनमोकळे खुलासे' आणि 'सटरफटर गप्पा' असतील.

Nothing serious बर कां..तेव्हा आमच्या ह्या कॉलममधली

पहिली प्रेमळ सूचना--हे मासिक आम्ही दर महिन्याच्या पहिल्या तारखेस Upload करतो, तेव्हा प्रेषकांनी त्यांचे साहित्य कमीत कमी ५ दिवस तरी अगोदर ई-मेलने पाठवावे.

पहिली नम्र विनंती--- जमल्यास साहित्याबरोबर, तुमचा एखादा फोटो पाठवू शकाल काय?तुमची संमती असल्यास आम्ही तो प्रसिद्ध करू.

पहिला मनमोकळा खुलासा- गेल्या जानेवारीच्या अंकात मी ' दर शनी रविवारी' हे गाणे(audio) टाकले होते. त्या गाण्यात 'नीना', 'मीना', 'वीणा', 'अरूणा', अशा चार मुलींच्या नावांचा उल्लेख आहे. हे गाणे ऐकल्यावर शिवाजी-पार्कवर रहाणा-या मीना नावाच्या मुलीच्या नव-याची मला चिडून ई-मेल आली होती. तेव्हा यापुढे इतर कोणी मुलींच्या नव-यांचे मला फोन किंवा ई-मेलस् येऊ नये म्हणून माझा आधीच खुलासा.....मी मूळचा बडोद्याचा, पोटापाण्यासाठी म्हणून मी मुंबईला नोकरीला आलो. तेथे असताना दादरला मी शिवाजी-पार्क जवळील एका हॉटेलमध्ये काही महिने राहत होतो. कधीकधी आम्ही काही मित्र शिवाजीपार्क चौपाटीवर फिरावयास जायचो.एवढीच ती काय माझी चौपाटीबरोबरची सलगी. गाण्यात ऊल्लेखलेले रुपारेल तसेच रूईया कॉलेज exactly कोठे आहे, हेसुध्दा मला खरोखर माहीत नाही. तेव्हा त्या नावांच्या मुलींनी तसेच त्यांच्या नव-यांनी कृपया गैरसमजूत करून घेऊ नये.

पहिल्या सटरफटर गप्पा- त्या असतील पुढच्या महिन्याच्या अंकात म्हणजे मार्चमध्ये. तोपर्यंत तुम्ही आमच्या ह्या अंकाबध्दल गप्पा मारा आणि जमल्यास आम्हाला त्या ई-मेलने जरूर कळवा

सुहास पै